# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- २३०/२०२४

**अपिलार्थी, श्री.नितीन देशमुख**
००१, सावित्री आवास,
मोहनानंद नगर, मांजर्ली
बदलापूर (प), जि.ठाणे ४२१ ५०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, चिरड,
ता.मुरबाड, जि.ठाणे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती कार्यालय मुरबाड,
ता.मुरबाड, जि.ठाणे ४२१ ४०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १०.०६.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०४.२०२३ | -- | २०.०६.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १२.०१.२०४ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०६.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.आनंद वामन मुरेकर, विस्तार अधिकारी, पंचायत समिती मुरबाड उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.ज्योती जर्नादन गोंधळी, ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिरड, ता.मुरबाड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" दि.०१ एप्रिल २०१७ ते दि.२१.०४.२०२३ या कालावधीतील प्रतिवर्षी ऑडिट रिपोर्टच्या प्रति नमुना २७ लेखा परीक्षणातील आक्षेपाच्या पूर्ततेच्या मासिक विवरण नोंदवही नमुना ३० ग्रामपंचायत लेखा परीक्षण आक्षेप पूर्तता नोंदवही."*

सदर प्रकरणी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांना दि.१६.१०.२०२३ रोजी माहितीचे अवलोकन दिलेले आहे. माहितीचे अवलोकन दिल्यानंतर त्यांचे समाधान झाल्याने त्यांनी प्रकरण निकाली काढण्याबाबत लिहून दिले आहे. सदर पत्राची प्रत सादर केली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१३.१०.२०२३ रोजी अपिलार्थी यांना विनामुल्य माहिती देण्याचे आदेश पारित केले होते. अपिलार्थींची सुध्दा तीच मागणी आहे. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या दि.१६.१०.२०२३ रोजीच्या पत्रात असे नमूद केले की, त्यांनी दि.१६.१०.२०२३ रोजी माहितीचे अवलोकन केले असून, सदर माहिती अर्ज निकाली काढण्यात यावा. तथापि अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना अशाप्रकारे लेखी दिल्यानंतर, आयोगाकडे दि.१६.११.२०२३ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील आयोगास दि.१२.०१.२०२४ रोजी प्राप्त झाले आहे.

सदर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर असे लक्षात येते की, यामध्ये दोन प्रश्न उद्भवतात. पहिला प्रश्न म्हणजे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचा आदेश हा विनामुल्य माहिती पुरविण्याचा असताना

देखिल जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीचे फक्त अवलोकनच का दिले, संपूर्ण माहिती का दिली नाही याचा बोध होत नाही. तसेच अपिलार्थी यांची वर्तवणूक सुध्दा समजण्यापलीकडची आहे. त्यांनी दि.१६.१०.२०२३ रोजी जन माहिती अधिकारी यांना माहितीचे अवलोकन केले असल्याने, अर्ज निकाली काढण्यात यावा असे लिहून दिले आहे. व त्यानंतर दि.१६.११.२०२३ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. या कारणामुळे जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांच्या वर्तवणूकीबाबतचा लेखी खुलासा त्यांनी आयोगासमोर सादर करणे आवश्यक आहे.

सबब जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे माहिती पुरविण्याचे आदेश असतानाही माहिती न पुरविता माहितीचे अवलोकन का दिले? याचा खुलासा आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच अपिलार्थी यांनी दि.१६.१०.२०२३ रोजी माहितीचे निरीक्षण करुन, त्यांचे समाधान झाले असून, माहिती अर्ज निकाली काढण्याबाबत त्यांच्या स्वाक्षरीने जन माहिती अधिकारी यांना लेखी दिल्यानंतर आयोगाकडे द्वितीय अपील का सादर केले? याबाबतचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे माहिती पुरविण्याचे आदेश असतानाही माहिती न पुरविता माहितीचे अवलोकन का दिले? याचा खुलासा आयोगाकडे पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा.
२. अपिलार्थी यांनी दि.१६.१०.२०२३ रोजी माहितीचे निरीक्षण करुन, त्यांचे समाधान झाले असून, माहिती अर्ज निकाली काढण्याबाबत त्यांच्या स्वाक्षरीने जन माहिती अधिकारी यांना लेखी दिल्यानंतर आयोगाकडे द्वितीय अपील का सादर केले? याबाबतचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी सादर करावा.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०५.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० जून , २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, चिरड,
ता.मुरबाड, जि.ठाणे.